मिरा-भाईंदर महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रसिद्धीपत्रक

- **मिरा-भाईंदरमध्ये अनधिकृत बांधकामांवर हातोडा !**
- **२६ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त – आणखी २५ वर लवकरच कारवाई**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा (भा.प्र.से.) यांच्या स्पष्ट निर्देशांनुसार महानगरपालिका प्रशासनाने आज वॉर्ड क्रमांक ६ मध्ये मोठी कारवाई करत २६ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली आहेत.तसेच आणखी सुमारे २५ अनधिकृत बांधकामांवर लवकरच कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाने दिली आहे.

महानगरपालिकेकडून शहरातील बेकायदेशीर बांधकामांना कठोर कारवाईचा हातोडा बसणार आहे.नागरिकांनी नियमानुसारच बांधकामे करावीत, अन्यथा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दिला आहे.